कि. बा. हजारे (अण्णा)
K. B. alias Anna Hazare

राळेगण सिद्धी, तालुका पारनेर,
जिल्हा अहमदनगर (महाराष्ट्र)
पिन - ४१४३०२
☎ ०२४८८-२४०४०१/२४०२२७
www.annahazare.org

Ralegan Siddhi, Tal. Parner,
Dist. Ahmednagar (Maharashtra)
PIN - 414302
☎ 02488-240401/240227
Email: annahazare@hotmail.com

जा. क्रं. भ्रविज २२३/ ०९-१०

दि. १२.०३.२०१०

**प्रति,**

**मा.ना.अशोकराव चव्हाण साहेब,**

मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य मंत्रालय,

मुंबई-३२

**विषय:- महाराष्ट्र सरकारने दारूबंदी धोरण ठरविणे बाबत...**

**महोदय,**

दिवसें दिवस दारू हि फार मोठी सामाजिक समस्या होत चालली आहे, खेडया पाडयातील कायदा आणि सुव्यवस्था दारूमुळे ढासळत चालली आहे, महिलांना रस्त्यावरून वागणे अवघड होत चालले आहे, युवाशक्ती ही आमची राष्ट्रशक्ती असून दारू सारख्या नशेच्या आहारी जाऊन युवाशक्ती बरबाद होत चालली आहे.शाळेतील मुलांनाही दारूचे व्यसन जडल्यामुळे अ परिमीत अशी सामाजिक,राष्ट्रीय हानी होत चालली आहे.

सदरची होणारी हानी पैशाने भरून निघणार नाही दारूबंदी संबंधाने अनेक वर्षे प्रयत्न करित आहोत या पूर्वी आम्ही दि. १२.०३.२००१ ते आजपावेतो सुमारे ८५ ते ९० वेळा झालेला पत्र व्यवहार पहावा. १००% दारूबंदी होऊ शकणार नाही लोकशाही मध्ये लोकांच्या बहुमताने ज्या ज्या गावात दारूला आळा घालणे शक्य आहे त्या त्या गावात लोकशाही मार्गाने हा प्रश्न कसा सोडविता येईल याचा विचार होणे आवश्यक आहे.

दारू संबंधाने शासनाने काही निर्णय घेतले आहेत. मात्र योग्य अंमलबजावणी होत नाही हि वस्तुस्थिती आहे, सरकारचे दारूबंदी संबंधाने धोरण कसे असावे या संबंधाने राज्य स्तरावर दि.१६ जून २००९ रोजी एक समिती केलेली असून त्या समितीने राज्याचे दारूबंदी धोरणासंबंधाने मसुदा तयार करावयाचा आहे. मात्र समिती स्थापन करून ९ महिन्यांचा प्रदिर्घ कालावधी गेला आहे. मात्र या समितीच्या बैठका झालेल्या नाहीत या वरून सरकार लोकशाही मार्गाने दारू धोरणा संबंधाने गांभीर्याने विचार करित नाही हे स्पष्ट होते, म्हणून ना इलाजास्तव दि.१६ मार्च २०१० रोजी सरकारने दारूबंदी धोरण जाहीर करावे. या मागणीसाठी सत्त्याग्रह करित आहे व या प्रश्नावर जनतेने ही या सत्त्याग्रहामध्ये सहभागी व्हावे यासाठी जनतेला आवाहन केले आहे. शासनाने दारूबंदी धोरण जाहीर करावे हि विनंती.

कळावे.

आपला

कि. बा. हजारे (अण्णा)

(कि.बा.तथा अण्णा हजारे)

प्रत: मा. ना. छगनरावजी भुजबळ साहेब, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

मा. ना. शिवाजीराव मोघे साहेब, मंत्री, सामाजिक न्याय व दारूबंदी, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

मा. श्री. जे.पी. डांगे साहेब, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२.

मा. श्री. चि.शि. संगीतराव, सचिव, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई -३२.